# SPORTS NEWS: Sanjeevan, Panhala

## संजीवनच्या निखील मिसाळचे जलतरण स्पर्धेत यश

**पन्हाळा :** सोमवार पेठ (ता. पन्हाळा) येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयामार्फत डॉ.



बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत आंतरविभागीय जलतरण स्पर्धा कोल्हापूर येथील सागर जलतरण तलाव येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या महाराष्ट्रातील विविध जिल्हातील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाचा सिव्हीलचा विद्यार्थी निखील निलेश मिसाळ याने ५०, १०० व २०० मीटर ब्रेस्ट स्टोक, ५० मीटर फ्री स्टाईल आणि ५० मीटर बटरफ्लाय या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. त्याला क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत इंगवले, कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजीव जैन, उपप्राचार्य डॉ. सुहास सपाटे, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. एकनाथ साळोखे, सिव्हील विभागप्रमुख डॉ. एम. एन. हिरेमठ, रजिस्टार बाळासाहेब कुंभार, अधीक्षक दिपक पाटील, संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

## जलतरण स्पर्धेमध्ये निखिल मिसाळ प्रथम



निखिल मिसाळ

**पन्हाळा :** सोमवार पेठ (ता. पन्हाळा) येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत आंतरविभागीय जलतरण (स्वीमिंग) स्पर्धा कोल्हापूर येथील सागर जलतरण तलाव येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाचा सिव्हिल विभागाचा विद्यार्थी निखिल नीलेश मिसाळ याने ५०, १०० व २०० मीटर ब्रेस्ट स्टोक, ५० मीटर फ्री स्टाईल आणि ५० मीटर बटरफ्लाय या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. त्याला क्रीडा शिक्षक डॉ. रणजित इंगवले, प्राचार्य डॉ. संजीव जैन, उपप्राचार्य डॉ. सुहास सपाटे, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. एकनाथ साळोखे, विभागप्रमुख डॉ. एम. एन. हिरेमठ, रजिस्ट्रार बाळासाहेब कुंभार, अधीक्षक दीपक पाटील, संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे अध्यक्ष पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Kolhapur-Today
26/11/2023 Page No. 2

पुण्यनगरी

## 'ॲथलेटिक्स'मध्ये स्नेहल पाटीलचे यश

**पन्हाळा :** सोमवार पेठ, ता. पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी



महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स विभागाची विद्यार्थिनी स्नेहल निवृत्ती पाटील हिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत झालेल्या विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये यश मिळवले. १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत व ट्रिपल जम्प स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. या स्पर्धा संजय भोकरे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मिरज यांनी येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित केल्या होत्या.

Smart Kolhapur Edition
Nov 26, 2023 Page No. 02
Powered by : eReleGo.com

## संजीवनच्या स्नेहल पाटील हिचे ॲथलेटिक्स स्पर्धेत यश

**पन्हाळा :** सोमवार पेठ (ता. पन्हाळा) येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयातील कॉम्पुटर सायन्स विभागाची विद्यार्थिनी कु. स्नेहल निवृत्ती पाटील हिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत झालेल्या विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये यश मिळवले. १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर ट्रिपल



जंप स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. सदरच्या स्पर्धा या संजय भोकरे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, मिरज यांनी आयोजित केल्या होत्या. येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे या स्पर्धा पार पडल्या. तिला क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत इंगवले, कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजीव जैन, उपप्राचार्य डॉ. सुहास सपाटे, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. एकनाथ साळोखे, काम्पुटर विभागप्रमुख प्रा. राहुल नेजकर, रजिस्टार बाळासाहेब कुंभार, अधीक्षक दिपक पाटील, संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.